## निशाणी क्र.१४ खालील आदेश
(दिनांक २०/११/२०२५)

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आज्ञा ०६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करण्याकरिता दाखल केला आहे.

२. वादीने असे कथन केले की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरूध्द कायम मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दावा दाखल करतेवेळी शेतजमीन मौजे पिंपरखेड बु., गट क्र.३६७ एकुण क्षेत्र १४ हेक्टर १६ आर पैकी वादीच्या मालकीचे १ हेक्टर ४९ आर क्षेत्र दाव्यामध्ये समाविष्ट केले आहे. आता वादीच्या अर्जामध्ये वादीचे मिळकत मालकीचे क्षेत्र १ हेक्टर ४१ आर असे असून ते वादीस दुरूस्त करावयाचे आहे. सदर दुरुस्ती केल्यामुळे दाव्याच्या मुळ परिस्थितीमध्ये कोणताही बदल होणार नाही. तसेच दावा दुरूस्ती केल्यामुळे दावा चालविणे न्यायाच्या दृष्टीने सोपे होईल व नैसर्गिक कायद्याच्या दृष्टीने वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसार होणार नाही. करिता प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी क्र.१ व ४ विरूध्द दावा हा एकतर्फा चालविण्यात आला आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी अर्जास त्यांचे म्हणणे मांडले की, वादीने प्रस्तुतचा अर्ज शपथपत्राशिवाय दाखल केला आहे. तसेच वादी दाव्याचे स्वरुप बदलू इच्छीतो. करिता अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

५. सदरचा दावा हा मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीच्या दाव्याचे अवलोकन केले असता वादीने दाव्यामध्ये शेतजमीन मौजे पिंपरखेड बु., गट क्र.३६७ एकुण क्षेत्र १४ हेक्टर १५६ आर पैकी वादीच्या मालकीचे १ हेक्टर ४९ आर क्षेत्र दाव्यामध्ये समाविष्ट केले आहे. आता वादीस दाव्यामध्ये वाद मिळकत मालकीचे क्षेत्र १ हेक्टर ४१ आर

असे दुरूस्त करावयाचे आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे वादीस सदरची प्रस्तावीत दुरुस्ती करण्याची परवानगी देणे उचित ठरणार आहे.

६. वादी यांनी मागणी केलेली दुरूस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होत नाही. त्याचप्रमाणे मागणी केलेली दुरूस्ती गरजेची आहे. त्यामुळे भविष्यातील गुंतागुंत टाळण्याकरीता न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजुर करणे गरजेचे आहे. याउलट, सदर दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता उपयोगी होईल. अशा परिस्थितीत जर प्रस्तावित लेखी निवेदन मध्ये दुरुस्ती मंजूर केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

आदेश

१. सदरचा अर्ज रु.१००/- च्या खर्चाच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने दाव्यापत्रात प्रस्तुत अर्जात नमुदप्रमाणे दुरुस्ती करुन दुरूस्ती दावा दाखल करावा.

दिनांक २०/११/२०२५

स्वाक्षरीत/-
(श्रीमती एल. एन. पांचाळ)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
घनसावंगी.